पुणे जिल्हा परिषद ,पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
जा.क्र.जि.प.शिक्षण /प्राथ.खाप्राशा / १३१८/२०१९
पुणे -१ दिनांक - ७ /१२/२०१९

प्रति ,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक ,
श्री खंडेराय प्रतिष्ठाणचे बालेवाडी श्री एम इंटरनॅशनल स्कूल बालेवाडी पुणे ,जि.पुणे

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ - १.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१३

२. शासन निर्णय क्र.एसएफएस १०१९/ प्र क्र ९१एसएम २ दिनांक१/३/२०१९

३. मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे जा.क्र.शिउसं/प्राशि-१०९२७ दिनांक १७/५/२०१४

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान शाळेस दर्जावाढीने उच्च प्राथमिक इ.६ वी ते इ.८ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नविन शाळा /दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री खंडेराय प्रतिष्ठाण बालेवाडी ता हवेली जि.पुणे | श्री एम इंटरनॅशनल स्कूल बालेवाडी पुणे ,जि.पुणे | इंग्रजी | इ.६ वी ते ८ वी | उच्च प्राथमिक | २०१८-१९ |

अटी व शर्ती

१. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम,शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणी व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केलेल्या शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदीनुसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी आहे.

४. संदर्भ क्र.२ अन्वये सन २०१३-१४ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

५. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

६. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहिल.

७. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

९. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहिल